# मुखवटे सोलताना

**वास्तव आणि आभासी जीवनाचे दर्शन घडवणाऱ्या,**
**विचारांना प्रवृत्त करणाऱ्या संवेदनशील कथांचा संग्रह!**

**मलिका अमर शेख**

**रिया पब्लिकेशन्स्**

६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी दुसरी गल्ली, कोल्हापूर - ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**मुखवटे सोलताना**
मलिका अमर शेख

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्,
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी दुसरी गल्ली, कोल्हापूर - ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**लेखिका**
मलिका अमर शेख
४०४ 'बी', फ्लोरीडा, शास्त्रीनगर,
अच्युतराव पटवर्धन मार्ग, अंधेरी (प.)
मुंबई- ४०००५३

**अक्षरजुळणी**
अजब ग्राफिक्स

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे

**आवृत्ती**
ऑगस्ट २०१६

**किंमत**
₹ ३६०/-

# मुखवटे सोलताना

# *अनुक्रमणिका*


| | | |
|---|---|---|
| १) काळ | ......... | ७ |
| २) ते पाहतायत...! | ......... | ३२ |
| ३) शांतम् पापम्...! | ......... | ४६ |
| ४) ब्रेनड्रेन | ......... | ५३ |
| ५) प्लॅट फॉर्म नं. ६ | ......... | ६८ |
| ६) द्रष्टा...? | ......... | ८३ |
| ७) रोज बार्लेन्सिस | ......... | १०४ |
| ८) ॲडम | ......... | ११८ |
| ९) पुनर्जन्म | ......... | १२५ |
| १०) भुतांच्या गजाली | ......... | १२९ |
| ११) तिसरी घंटा! | ......... | १४० |
| १२) अबोल झालीस का... | ......... | १६० |
| १३) चकवा | ......... | १६९ |
| १४) तराजू | ......... | १७५ |
| १५) पहिली रात्र... | ......... | १८३ |
| १६) खिडकी | ......... | १९१ |
| १७) मित्र | ......... | १९४ |
| १८) रस्त्याचं शेवटचं टोक (पंचतंत्र-१) | ......... | २०२ |
| १९) विस्डम (पंचतंत्र-२) | ......... | २०४ |
| २०) पंचतंत्र-३ | ......... | २०६ |

२१) पंचतंत्र-४ ......... २०७
२२) पाऊसघरातल्या गाण्याची गोष्ट ......... २०८
२३) आसरा ......... २११
२४) कोंबडी ......... २१९
२५) लगीन ......... २३६
२६) हातारी ......... २४०
२७) ग्रीन अपार्टमेंट ......... २४७
२८) अस्तित्व ......... २६५
२९) तिसरा डोळा ......... २८१
३०) शिकार ......... २९०

✦✦✦

# काळ

दिवस उगवलाच. सगळीच शहरं कामाला लागली नेहमीप्रमाणे. माणसं जगत-जन्मत-मरत राहिली नेहमीप्रमाणे. यात खंड नव्हताच कुठंच.

राज्यसत्ता ढासळत-सावरत काहीच झालं नाही अशा गुर्मीत पुन्हा राज्य करायला समर्थ होतच होत्या. चाकरदार ९.२५ ची लोकल पकडायला जीव तळहातावर घेऊन धावतच होता. सर्व घरच्या बाया चूल फुंकत, कुकर लावत, रोट्या भाजतच होत्या; तर शहरात असं सर्वच चालू असताना गावाकडं लोकांचं कर्ज काढणं-मरणं चालूच होतं.

बलुतेदार पद्धती, कूळपद्धती सगळं बयाजवार. अन्यायपण कसे पद्धतशीरपणे कायद्यात बसवलेले. जमीनदार, सावकार, पाटील सगळ्यांची मग्रुरी कशी कायद्यानं सगळे फेस करायचे.

पार आपल्या आया-बहिणी-बायकांना जमीनदाराच्या वाड्यावर पाठवण्याइतपत साऱ्यांचा कणा मोडलेला. मग आत्ताच गव्हर्नमेंटाचं कर्ज घेऊन त्यांना काय हे खूळ सुचलं? खरंखुरं मरायचं आपण असा प्रश्न पारावर विचारला जायला लागला.

तर म्हणजे कसं, सगळीकडेच भारतवर्षात कळणार नाही, पण खुपतेय् अशी अंदाधुंदीच.

मागल्या दारानं परदेशी कंपन्या आत येतायत्. राजकारणी लोक न् मवाली गुंड न् स्मगलर यांच्यात काय फरक ओळखू येईना. बुद्धिमंत गळाठलेत. थोडंफार च्याव च्याव करणाऱ्या लोकांच्या अज्ज्ञात मोळ्या बांधल्या जातायत् तत्काळ.

न् अशात हे लोक आपापलं नशीब आजमावायला शहरात येऊन धडकलेले-जसे जगभरात माणसं इथून तिथं जातातच कायमचं-तसेच.

✦

''पोरगं कुठं उलथलं?''

''आता सयपाक करू का पोराला शोधू जाऊ? असाल कुठंतरी!''

''हे गाव नाहीय्. पोरं पळवून नेत्यात. चल ऊठ. त्याला बघ. मी ही वलाणी बांधून मग वाण्याकडं जाऊन रेशन बघतो!''

''आधी काम बघा जावा!''

''हाः तुज्या बानं काम ठेवलय् लगोलग मिळायला!''

''माज्या बानं फुकटची कामवाली तं दिलीय् ना! सोताचं काम पण शोधाया जमंना का?''

''जातीस का हाणू?''

''तुमाला दुसरं काय येतंय्?''

''आता तुला काय...!''

✦

''छानय्!''

''भाडं फारय्. अर्धे पैसे यातच जाणार!''

''दुसरा इलाज नाही. नाहीतर अंबरनाथ, मीरा रोड, विरार जाण्यायेण्यात अर्धे पैसे न् आयुष्य जाणार.''

''मला खिळा मारताना पण विचार करावा लागेल या घरात!''

''लोकांना खिळा मारण्याइतकीपण जागा मिळत नाही इथं हे लक्षात ठेव!''

''तुम्ही उद्याच जॉईन होणार?''

''हो...! का...?''

''असंच... मीही उद्या जिम न् कॉम्प्युटरचा क्लास जॉईन करावा म्हणते!''

''सकाळचा डबा नीट दे म्हणजे झालं. दोन दिवस हॉटेलचं जेवून वैताग आलाय्!''

✦

''काय नाव तुझं?''

''अपर्णा, पण मला सगळे पन्ना म्हणतात.''

''कुठलं गाव?''

''सात्तीपूर! पण नवरा आहे बिहारचा...! आम्ही आता हल्ली आलो इथं!''

''लिहिता वाचता येतं?''

''येतं कामापुरतं; पण काम तर लिखापढीचं नाय करणार. धुणं, भांडी घासपूस, झाडलोट बस्स झालं. स्वयंपाकपण येतो, पन् दाखवाया लागंल दोन एक दिस!''

''नाही! दोन माणसांचा स्वयंपाक तो काय न् मला नाही आवडत झाडलोट करणारीनं चपात्या केलेल्या. तू आपली वरकामं कर. सकाळी न् संध्याकाळी.''

''बरं. येते उद्यापास्नं!''

✦

''गॅरेजमध्ये काम भेटलंय्!''

''अरे यार! यहाँ बस काम करो. रोटी मिलही जाती है...!''

''भाकरीसाठी इथवर यावं लागलं. यहाँ ना कोई पहचानका ना रिश्तेदार. अजीबसा लगता है!''

''भाकरी पहचानकी है भिडू! और वही पेटकी सच्ची रिश्तेदार. अहिस्ता अहिस्ता आदत पड जायेगी. और फिर गाँवसे बुलावा आ जाए तोभी दौडोगे नही. उलटा बोलोगे, गाँवमे क्या रख्या है अब... हां...? हॅ हॅ...!''

लालूनं मान हलवली. पटलं नं पटलंसं. त्याला माहीत नव्हतं तोवर–पटलं नाही तरीही ही महानगरी सगळ्यांना नकळत शोषून घेते आपल्यात आणि लालूनं तर कुटुंबासकट इथल्या जगड्व्याळ चक्राचा खिळा होणं मान्य केलेलंच इथं येऊन...!

✦

''नंबर १ प्लॅटफॉर्मची लोकल...!''

''नंबर ४ की विरार लोकल आज पाच मिनट देरीसे...!''

''अय्या, कालच भेटलेला मला...!''

''इतकं दुखतं ना न् हे म्हणजे ढिम्म हलत नाही बिल्कुल!''

''सब सडेल माल दिया सालेने...!''

''इन्क्रिमेंट पाहिजे तर हे असं केलं पाहिजे!''

विविध संवाद आदळत होते. ती नुसतीच बसून राहिली बाकड्यावर. कशाशीच रिलेट करू न टाकणाऱ्या वास्तवाशी तिचं नातं डायरेक्ट लावलं गेलेलं... ओळखदेख नसलेल्या पुरुषाबरोबर एखाद्या बाईचं लग्न लावून द्यावं

तसं... फक्त ती बाई न् तो पुरुष एवढं बस असतं असं मानणाऱ्या जमातीपैकी हीही एक जमात.

✦

''कसा गेला तुझा या शहरातला पहिला दिवस?''

''...''

''ऽऽ...''

''दूर हो...!''

''Anything wrong ?''

''मला नाही आवडत. मला घेऊन चल, न् ती रडू लागली...''

''Oh Baby...'' त्यानं तिला जवळ ओढलं न् ती पूर्ण रात्र तिला 'समजवण्यात' घालवली.

✦

''पाच हजार पुरणार नाहीयत् इथं. रेशनचं दोन हजार, गॅसला पाचशे, वीज बील दोन हजार, भाडं पाच हजार... कुठं पुरी पडणार मी?''

''तुझ्यासाठी नोकरी पाह्यलीय मी.''

''नोकरी? माझ्यासाठी? पण मला तर...''

''दोघांचे दहा-पंधरा हजार...''

तिनं भराभरा स्वयंपाकघर आवरलं. बाहेरून कुठल्यातरी लग्नाचा पूजेचा लाऊडस्पीकर किंचाळत गाणं म्हणत होता. तिला नवा हुरूप आला. नवी जागा तिला छान वाटू लागली. आपलं नवं काम, आपले पैसे, आपलं घर, आपला नवरा सगळं कसं छान आपलं स्वतःचं...!

✦

''आज देर क्यूँ हुआ?''

''साब, वो रॅली निकला था इता ट्रॅफिकजाम!''

''चिचा, तू तो विरारसे आता है। क्या तुझे भी रॅली मिली क्या?''

''नही! पास निकालनेको टैम नही मिला कल. आज विदाउट तिकीट पकड लिया...!''

''हरेक का साला एक अलग झमेला...!''